शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व त्यांच्याशी संलग्नित
रुग्णालयातील सहयोगी प्राध्यापक संवर्गाचा विषयनिहाय
आकृतीबंध..
**सहयोगी प्राध्यापक, सुघटनशल्यचिकित्साशास्त्र**

महाराष्ट्र शासन
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**
शासन निर्णय क्र. : File No.MEDD-१२/२१/२०२५-MMD(Vais-२)/९८२६०९
९ वा मजला, नवीन गो.ते.रु.इमारत, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक:- १७ फेब्रुवारी, २०२३

**वाचा :-** १) वै.शि.व औ.द्र.वि., शा.नि. क्र.पदआ-२०१०/प्र.क्र.२५२/१०/वैसेवा-२, दि.२७.१०.२०१०
२) वै.शि.व औ.द्र.वि., शा.नि. क्र.पदआ-२०२२/प्र.क्र.२७/२२/वैसेवा-२, दि.२४.०१.२०२३
३) वै.शि.व औ.द्र.वि., शा.नि. क्र MEDD-१७०७/८/२०२४-MMD(Vais-१/८१५८६७ दि.१४.१०.२०२४

शासन निर्णय :-

संदर्भाधिन शासन निर्णय क्र. १ अन्वये वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या आस्थापनेवरील तसेच त्यांचया अखत्यारीतील शासकीय वैद्यकीय, दंत महाविद्यालये व त्यांच्याशी संलग्नित रुग्णालये, आरोग्य केंद्रे, परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई या संस्थांमधील वर्ग-१ ते वर्ग-४ च्या शैक्षणिक व अशैक्षणिक पदांचा आढावा घेवून सहयोगी प्राध्यापक या संवर्गाच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली आहे. तद्नंतर झालेल्या पदनिर्मितीमुळे शासन निर्णय दि.२४.०१.२०२३ अन्वये सहयोगी प्राध्यापक, सुघटनशल्यचिकित्साशास्त्र संवर्गाचा एकूण ०४ पदांचा संस्थानिहाय आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे.

२. आता, शासन निर्णय दि.१४.१०.२०२४ अन्वये अतिविशेषोपचार रुग्णालय, यवतमाळ, लातूर, अकोला व छत्रपती संभाजीनगर येथे नव्याने पद निर्माण करण्यात आल्याने सहयोगी प्राध्यापक, सुघटनशल्यचिकित्साशास्त्र या विषयात प्रत्येकी ०१ प्रमाणे एकूण ०४ पदाची वाढ झाली आहे. त्यामुळे शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, दि.२४.०१.२०२३ अन्वये मंजूर केलेला आकृतीबंध व तदनंतर नव्याने निर्माण केलेली पदे विचारात घेऊन सहयोगी प्राध्यापक, सुघटनशल्यचिकित्साशास्त्र संवर्गाचा संस्थानिहाय आकृतीबंध पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मंजूर पदसंख्या |
|---|---|---|
| १ | ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | १ |
| २ | बे.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे | १ |
| ३ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर | १ |
| ४ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालय, औरंगाबाद | १ |
| ५ | श्री.व.ना. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, यवतमाळ | १ |
| ६ | श्री.वि.दे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, लातूर | १ |
| ७ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, अकोला | १ |
| ८ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर | १ |
| | एकूण | ८ |

सहयोगी प्राध्यापक, सुघटनशल्यचिकित्साशास्त्र या विषयातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयनिहाय हा आकृतीबंध अंतिम आहे. त्यामुळे कोणत्याही अध्यापकाच्या वैयक्तिक हिताकरीता यापुढे एका विषयातील पद दुस-या विषयात रुपांतरीत करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केल्यास तो मान्य केला जाणार नाही.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सु.द.धोंडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये. (संचालक, वै.शि. व सं. मुंबई यांचेमार्फत)
४) निवड नस्ती (वैसेवा-२).